# The Shore Nuisances (Bombay and Kolaba) Act, 1853

## (BOMBAY XI OF 1853)

## (मुंबई आणि कुलाबा येथील) समुद्र किनाऱ्यावरील उपद्रवासंबंधीं अधिनियम, १८५३.

अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| प्रस्तावना. | | पृष्ठ |
| कलमें. | | |
| १. | उपद्रवकारक वस्तु काढून टाकण्याबाबत नोटीस देण्याचा अधिकार. नोटीस देण्याची पद्धत. नोटिशींतील मजकूर. नोटिशीचा नमुना. | ६७ |
| २. | उपद्रवकारक वस्तु काढून टाकण्याचा हक्क नाकबूल करणाऱ्या इसमानें विनंति-अर्ज करणें. त्यावरील कामकाजाची पद्धत. | ६७ |
| ३. | हक्क सिद्ध करण्याचा बोजा ... ... ... ... ... | ६८ |
| ४. | विनंती-अर्जासाठीं मुदत ... ... ... ... ... | ६८ |
| ५. | कलेक्टरला उपद्रवकारक वस्तु काढून टाकण्याची व्यवस्था केव्हां करतां येईल. अधिपत्राचा नमुना निस्तारण. | ६८ |
| ६. | ज्या सामानामुळें कोणतेंहि अतिक्रमण झालेलें असेल तें विकण्याचा अधिकार ... | ६८ |
| ७. | बादशहाच्या हक्कांचा बचाव ... ... ... ... ... | ६८ |
| ८. | पूर्ण भरतीची रेषा ... ... ... ... ... ... | ६८ |
| | अनुसूचि ... ... .. ... ... ... ... | ६८ |

# सन १८५३ चा अधिनियम ११*.

## (मुंबई आणि कुलाबा येथील) समुद्र किनाऱ्यावरील उपद्रवासंबंधीं अधिनियम, १८५३.

[१५ जुलै १८५३.]

हा अधिनियम पुढील अधिनियमान्वयें अंशतः रद्द करण्यांत आला आहे :—

सन १८५५ चा अधिनियम २२.

सन १८७० चा अधिनियम १४.

या अधिनियमांत भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वयें अनुकूलन व रूपभेद करण्यांत आले आहेत.

### मुंबई आणि कुलाबा बेटांत पूर्ण भरतीच्या रेषेखालील जमिनीवरील उपद्रव दूर करणें, तसेंच त्या रेषेखालील जमिनीवरील अतिक्रमण करणाऱ्या वस्तु काढून टाकणें हें सुकर करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, मुंबई आणि कुलाबा बेटांस मोठा समुद्र किनारा आहे आणि मुंबई बेटांतील जहाजांची ये-जा सुरक्षिततेची व्हावी या दृष्टीनें आणि सामान्यपणें लोकहिताच्या दृष्टीनें उक्त बंदरांत पूर्ण भरतीच्या रेषेखालील जमिनीवरील किंवा उक्त बेटांच्या किनाऱ्यावर किंवा किनाऱ्याच्या आसपास असलेल्या उपद्रवकारक व अडथळा आणि अतिक्रमण करणाऱ्या वस्तु काढून टाकण्याचें काम सुकर होणें इष्ट आहे; त्याअर्थी, पुढीलप्रमाणें अधिनियमित करण्यांत आला आहे :— प्रस्तावना.

१. मुंबई येथील जमीन महसूल कलेक्टर यास मुंबई बंदरांत पूर्ण भरतीच्या रेषेखालील जमिनीवर किंवा उक्त मुंबई आणि कुलाबा बेटांच्या किनाऱ्यावर किंवा किनाऱ्याच्या आसपास असलेली कोणतीहि उपद्रवकारक किंवा अडथळा किंवा अतिक्रमण करणारी वस्तु काढून टाकण्याविषयीं ज्याद्वारें फर्माविण्यांत येईल अशी नोटीस देतां येईल व त्याने तसें करणें हें विधिसंमत असेल. अशी नोटीस ज्याबद्दल तक्रार असेल त्या अतिक्रमणाच्या किंवा अडथळयाच्या वस्तूच्या जागीं किंवा उपद्रवकारक वस्तूच्या जागीं किंवा त्या जागेच्या जवळ असलेल्या ठळक ठिकाणीं चिकटवून आणि राजपत्रांत प्रसिद्ध करून देण्यांत आली पाहिजे. उक्त उपद्रवकारक वस्तु किंवा अडथळा किंवा अतिक्रमण करणारी वस्तु एक महिन्याच्या आंत काढून टाकण्यांत आली नाहीं किंवा असा उपद्रव अथवा अतिक्रमण बंद करण्यांत आलें नाहीं तर उक्त कलेक्टरला तें काम करावें लागेल असेंहि उक्त नोटिशींत नमूद केलें पाहिजे ; अशी नोटीस या अधिनियमास जोडलेल्या अनुसूचींत दिलेल्या नमुना क्रमांक १ या नुसार किंवा तशाच रीतीनें देतां येईल. उपद्रवकारक वस्तु काढून टाकण्याबाबत नोटीस देण्याचा अधिकार. नोटीस देण्याची पद्धत. नोटिशीमधील मजकूर. नोटिशीचा नमुना.

२. उपद्रव बंद करण्याचा किंवा उपद्रवकारक वस्तु काढून टाकण्याचा उक्त कलेक्टरचा हक्क कोणताहि इसम नाकबूल करील तर, त्या इसमानें मुंबई येथील सर्वोच्च न्यायाधिकरणास विनंती-अर्ज केला पाहिजे. असा विनंती अर्ज उपरोक्त नोटीस देण्यांत येईल त्यानंतर एका महिन्याच्या आंत केला पाहिजे आणि स्वतःस जो हक्क आहे असें त्याचें म्हणणें असेल त्या हक्कासंबंधींचीं कारणें अशा अर्जांत नमूद केलीं पाहिजेत आणि असा उपद्रव कमी करण्यास किंवा उपद्रवकारक वस्तु काढून टाकण्यास उक्त कलेक्टरला निरोध करावा अशी विनंती केली पाहिजे ; आणि त्यानंतर (विनंति-अर्ज करणाऱ्या इसमानें खर्चाबद्दल पुरेसें तारण दिल्यावर) उक्त न्यायाधिकरणानें अशा विनंति-अर्जाची सुनावणी करण्यासाठीं आणि त्यावर न्यायनिर्णय देण्यासाठीं वेळ ठरवून दिली पाहिजे. तसेंच, आपणांस योग्य वाटेल असें निदेश आणि आदेश दिले पाहिजेत. आणि उक्त विनंति-अर्जावर न्यायनिर्णय होईपर्यंत किंवा त्यावर खटल्याचें कामकाज न चालवितां आल्यामुळें, तो काढून टाकण्यांत येईपर्यंत, ज्याबद्दल तक्रार आहे असा उपद्रव, अडथळा किंवा अतिक्रमण वाढू देण्यास किंवा उक्त कलेक्टरनें तो उपद्रव, अडथळा किंवा अतिक्रमण बंद करण्यास किंवा उपद्रवकारक किंवा अडथळा किंवा अतिक्रमण करणारी वस्तु काढून टाकण्यास निरोध करणारा आदेश देण्याचाहि उक्त न्यायाधिकरणास अधिकार आहे. उपद्रवकारक वस्तु काढून टाकण्याचा हक्क नाकबूल करणाऱ्या इसमानें विनंती-अर्ज करणें, त्यावरील कामकाजाची पद्धत.

---

*दिनांक १ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला

हक्क सिद्ध करण्याचा बोजा.

३. अशा प्रत्येक विनंति-अर्जाची सुनावणी झाल्यावर, जो हक्क आपणास आहे असें विनंति-अर्ज करणाऱ्या इसमाचें म्हणणें असेल तो हक्क सिद्ध करण्याचा बोजा अर्जदारावर असेल.

विनंती अर्जासाठीं मुदत.

४. अशी एक महिन्याची मुदत संपल्यावर, कोणत्याहि इसमास कोणताहि उपरोक्त विनंति-अर्ज करण्यास परवानगी देतां कामा नये. मात्र उक्त न्यायाधिकरणाकडे विलंबाबद्दल समाधानकारक स्पष्टीकरण करण्यांत आल्यास, अशी मुदत संपल्यावरहि विनंति-अर्ज करण्याची परवानगी देतां येईल.

कलेक्टरला उपद्रवकारक वस्तु काढून टाकण्याची व्यवस्था केव्हां करतां येईल. अधिपत्राचा नमुना निस्तारण.

५. उक्त एक महिन्याच्या मुदतींत असा कोणताहि विनंति-अर्ज करण्यांत आला नाहीं तर, किंवा तो करण्यांत येऊन त्याचा निर्णय विनंति-अर्ज करणाऱ्या इसमाच्या हक्काविरुद्ध देण्यांत आला तर, किंवा त्यावर खटल्याचें कामकाज न चालवितां आल्यामुळें, तो काढून टाकण्यांत आला तर, कलेक्टर यास आपली सही असलेल्या अधिपत्रान्वयें अधिकृत केलेल्या कोणत्याहि इसमाकडून किंवा इसमांकडून पूर्वोक्त उपद्रव बंद करण्याची किंवा उपद्रवकारक वस्तु काढून टाकण्याची व्यवस्था करतां येईल. व त्याने तसें करणें विधिसंमत असेल. असें अधिपत्र, या अधिनियमास जोडलेल्या अनुसूचींत दिलेल्या नमुना क्रमांक २ यास अनुसरून किंवा तशाच प्रकारचें असेल. कोणताहि उपद्रव, अडथळा किंवा अतिक्रमण निर्माण करणाऱ्या वस्तु काढून टाकण्याच्या कामीं अपरिहार्य असलेल्या कोणत्याहि नुकसानीबद्दल उक्त कलेक्टरच्या अधिपत्रा-नुसार काम करणाऱ्या कोणत्याहि इसमावर जबाबदारी राहणार नाहीं.

ज्या सामाना-मुळें कोणतेंहि अतिक्रमण झालेलें असेल तें विकण्याचा अधिकार.

६. ह्या अधिनियमान्वयें काढून टाकलेलें कोणतेंहि अतिक्रमण किंवा अडथळा ज्या सामानामुळें झालेला असेल तें सामान विकण्याचा कलेक्टर यास अधिकार आहे. तसेंच त्यास विक्री करून आलेल्या उत्पन्नाचा विनियोग, उपद्रवकारक वगैरे वस्तु काढून टाकण्यासंबंधीं झालेला खर्च भागवितांना किंवा तो भागविण्यासाठीं करण्याचा अधिकार असेल आणि कोणतीहि रक्कम शिल्लक राहील तर, ती सरकारजमा होईल आणि केंद्रीय सरकार निदेश देईल, त्या रीतीनें, ती देण्यांत आली पाहिजे किंवा विनियोग करण्यांत आला पाहिजे.

बादशहाच्या हक्कांचा बचाव.

७. या अधिनियमांतील कोणत्याहि उपबंधामुळें, उक्त बंदराच्या कोणत्याहि भागांत किंवा उक्त बेटांच्या समुद्रकिनाऱ्याच्या कोणत्याहि भागांत बादशहास जे हक्क असतील त्यांत बाध येणार नाहीं किंवा अशा उपबंधांचा उक्त हक्कांवर परिणाम होणार नाहीं. तसेंच, हा अधिनियम संमत झाला नसता तर पूर्वोक्त उपद्रव आणि अतिक्रमण बंद करण्यासाठीं जी कोणतीहि दिवाणी किंवा फौजदारी कारवाई करतां आली असती, तीस अशा उपबंधामुळें प्रतिबंध होतो किंवा त्या किंवा ती करण्यांत त्यामुळें हस्तक्षेप करतां येतो असें समजतां कामा नये.

पूर्ण भरतीची रेषा.

८. या अधिनियमांतील "पूर्ण भरतीची रेषा" या शब्दांचा अर्थ पावसाळ्यांत येणाऱ्या पूर्ण भरतीची सामान्य रेषा असा होतो.

## अनुसूचि.

### नमुना क्रमांक १.

सन १८५३ चा अधिनियम क्रमांक ११ याअन्वयें, मुंबई येथील जमीन महसूल कलेक्टर हे याद्वारें अशी नोटीस देत आहेत कीं, (अतिक्रमणाचें वर्णन येथें लिहा) या नोटिशीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आंत अतिक्रमण काढून टाकण्यांत किंवा बंद करण्यांत आलें पाहिजें ; अन्यथा उक्त अधिनियमाच्या अधिकारान्वयें, उक्त कलेक्टरकडून तें अतिक्रमण काढून टाकण्यांत किंवा तें अतिक्रमण बंद करण्यांत येईल.

तारीख सन .

(कलेक्टरची सही).

नमुना क्रमांक २.

सन १८५३ चा अधिनियम क्रमांक ११ अन्वयें, मुंबई येथील जमीन महसूल कलेक्टरनें दिलेल्या अधिपत्रान्वयें——————राहणार——————यास (येथें अतिक्रमणाचें वर्णन लिहा) काढून टाकण्यासाठीं अधिकृत केलें आहे.

तारीख सन .

(कलेक्टरची सही.)